


# शालेय शिक्षण विभाग

## महाराष्ट्र शासन

## अर्थसंकल्प : २०१८-१९

**समर्थन**






**समर्थन**

**अर्थसंकल्प अध्ययन केंद्र**

१०५, लोटस हाऊस, लिबर्टी सिनेमाच्या बाजूला,

बॉम्बे हॉस्पिटल जवळ, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग,

मरिन लाईन्स (पू), मुंबई -४०० ०२०

☏ ०२२-२२००३०६०

Email: samarthanmumbai97@gmail.com

Website: www.samarthanadocacy.org

# समर्थन

संस्थापक अध्यक्ष : **स्व. सदानंद वर्दे**

संस्थापक : **श्री. विवेक पंडित**

अध्यक्ष : **श्री. प्रविण महाजन**

उपाध्यक्ष: **श्री. आशिष कुलकर्णी**

कार्याध्यक्ष: **श्री. संतोष पाटील**

सचिव : **श्री. सुशील शुक्ल**

संपादन :

**मुक्ता भारती**

**विश्लेषण आणि संकलन:**

**रुपेश कीर -९८९२९३९६१७**

**मॅकेन्झी डाबरे - ९६६५००६४२९**

विशेष सहाय्य :

**स्नेहा घरत,अनुश्री करवा, सुनिल मिश्रा, विलास सुवरे, राजश्री कदम, उमेश सांगळे**

मांडणी व अक्षरजुळणी :

**प्रतिक्षा कोयंडे**

**नोंदणी क्रमांक:**

पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन क्र.एफ -१८९०३, मुंबई

सोसायटी रजिस्ट्रेशन क्र. एम. एस. मुंबई

१५६७/९६ जीबीबीएसडी

**प्रकाशक (पत्रव्यवहार):**

**समर्थन -** १०५, लोटस हाऊस,

लिबर्टी सिनेमाच्या बाजूला, बॉम्बे हॉस्पिटलजवळ,

सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग,

मरिन लाईन्स (पू), मुंबई -४०० ०२०

☏ ०२२-२२००३०६०

Email:samarthanmumbai97@gmail.com

website: www.samarthanadvocacy.org

# लोकशाही बळकट करण्याकरिता उपेक्षितांचे 'समर्थन'

## समर्थन विषयी थोडेसे

धोरणात्मक प्रश्नांवर राज्यातील विविध उपेक्षित समाजघटक व धोरणकर्ते यांच्यामधील दुवा म्हणजे 'समर्थन'. राज्याच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये उपेक्षितांच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबीत व्हाव्यात, त्यासाठी लोकशाही यंत्रणा अधिक लोकाभिमुख व्हाव्यात हा समर्थनचा उद्देश. समर्थन उपेक्षितांच्या न्याय्य हक्कांचे, त्यांच्या संघर्षाचे.

### 'समर्थन'च्या कामाचे विविध स्तर

- ◊ ग्रामीण संघटनांकडून व ग्रामीण पत्रकारांकडून येणारे लोकांचे प्रश्न समजून घेणे.
- ◊ प्रश्नांना राज्यस्तरावर प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिद्धी देणे.
- ◊ प्रश्नांवर विविध स्तरांवर चर्चा घडवून आणणे.
- ◊ विधिमंडळ सदस्यांपर्यंत प्रश्न पोहोचविणे.
- ◊ राज्य स्तरावर विविध लोकशाही यंत्रणांकडे, प्रशासनाकडे प्रश्नांचा पाठपुरावा करणे.
- ◊ आवश्यक असल्यास न्याययंत्रणेकडे दाद मागणे.
- ◊ ग्रामीण कार्यकर्ते व ग्रामीण पत्रकारांच्या क्षमता व कौशल्ये वाढावित यासाठी प्रशिक्षण देणे.
- ◊ लोकशाही यंत्रणेबाबतची माहिती प्रसारित करणे.
- ◊ अर्थसंकल्पासह राज्याच्या महत्त्वाच्या धोरणांचे विश्लेषण करणे.

# टिपण वाचण्यापूर्वी थोडेसे. . .

- 'समर्थन'ची प्रकाशने सत्तेतील तसेच विरोधातील सन्माननीय सदस्यांना उपयुक्त व्हावीत यासाठी असतात.
- सदर माहिती टिपणाचा उद्देश विधिमंडळ सभागृहांमध्ये राज्याच्या अर्थसंकल्पावर होणाऱ्या चर्चेत राज्याच्या अर्थसंकल्पातील माहिती सुलभपणे वाचता यावी आणि त्यामुळे विधिमंडळात दर्जेदार चर्चा व्हावी हा आहे.
- अर्थसंकल्प हा राज्याच्या धोरणाचा खराखुरा चेहरा असतो, प्राधान्यक्रमाचा आरसा असतो त्यामुळे अर्थसंकल्पातील तरतुदी राज्यातील दीन-दुर्बल घटकांच्या जीवनावर काय प्रभाव टाकतात यावर सभागृहात चर्चा व्हावी अशी अपेक्षा असते.
- माध्यमे जनमतावर प्रभाव टाकतात त्यामुळे धोरणकर्त्यांना त्याची दखल घ्यावी लागते. हे टिपण माध्यम प्रतिनिधींनाही संदर्भ पुस्तिका ठरावी असा प्रयत्न आहे.
- सदरची माहिती अर्थसंकल्पीय प्रकाशने, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या वित्तीय अहवाल, विनियोजन लेखे, शासनाच्या विविध विभागांनी, महामंडळांनी प्रकाशित केलेले अहवाल याच माहितीवर आधारित आहे. त्यात शासना व्यतिरिक्त अन्य संस्थांची मते अगर माहिती यांचा आधार घेतलेला नाही. त्यामुळे प्रत्येक माहितीखाली त्या माहितीचा स्त्रोत दिला आहे.
- तुलनात्मक अभ्यास करता यावा म्हणून २०११-१२ पासून २०१८-१९ पर्यंत अर्थसंकल्पातील प्रत्यक्ष खर्च आणि तरतूद समाविष्ट केली आहे.
- माहिती काटेकोरपणे तपासण्यात आली आहे. तरीही काही त्रुटी राहिल्यास त्या निदर्शनास आणल्यास ऋणी राहू.
- प्रकाशन अधिक माहिती पूर्ण सुलभ आणि प्रभावी व्हावे म्हणून आपल्या सूचनांचे स्वागत आहे.
- अर्थसंकल्पविषयक अधिक माहिती जाणून घेण्याची कुणाची इच्छा असल्यास या विषयातील अनुभवी पत्रकार, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ, विषयतज्ज्ञ तसेच निवृत्त सनदी अधिकारी यांचेमार्फत प्रत्यक्ष चर्चा घडवून आणण्याची जबाबदारी समर्थन स्वीकारीत आहे.
- प्रमुख सामाजिक सेवांचे विभागवार टिपण टप्प्या-टप्प्याने प्रसिद्ध करण्यात येईल.

विश्लेषण आणि संकलन:
रुपेश कीर -९८९२९३९६१७

**मार्गदर्शक-विवेक पंडित**
संस्थापक, समर्थन

# शाळाबाह्य मुलांचा प्रश्न शासन कसा सोडविणार...

- शिक्षण हक्क कायदा लागू होऊन सहा वर्ष झाली तरी अजून शाळाबाह्य मुले किती आहेत हे जर नक्की होत नसेल तर ही मुले शाळेत येणार कधी, शिकणार कधी? याचे उत्तर मिळायला हवे. शिक्षण मंत्री दोन्ही सर्वेक्षणाबाबत बोलताना ही पूर्ण सर्वेक्षण नाहीत असे सांगून शासकीय यंत्रणेचा बचाव करतात परंतु शिक्षण यंत्रणेने ही दोन्ही सर्वेक्षण परिपूर्ण झालेली आहेत असेच कागदावर दाखविले आहे. अशा प्रकारे क्रूरपणे राज्यातील शाळाबाह्य मुलांच्या सर्वेक्षणाकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर हे शासन कोणती कारवाई करणार आहे. शिक्षण हक्काचा कायदा आजच्या शालेय शिक्षण मंत्र्यांनी समजून घेण्याची आवश्यकता आहे. शिक्षणाचा हक्क सामाजिक बाब नसून प्रत्येक बालकाला तो हक्क आहे. तो त्याला जन्मत:च मिळाला आहे. आणि तो देणे हे शासनाचे घटनात्मक कर्तव्य आहे. शाळाबाह्य मुले किती हा काय विचार करण्याचा विषय आहे काय? एक बालक जरी शाळेच्या बाहेर असेल तर त्याला शिक्षण देण्याचे कार्य शासनाचे आहे.

- महाराष्ट्र शिक्षण परिषदेकडून मिळालेल्या माहितीनुसार दिनांक ४ जुलै २०१५ ते ३१ जानेवारी २०१६ या कालावधीमध्ये ७४ हजार ९७१ मुले शाळाबाह्य आहेत. तर पुढे जानेवारी, २०१७ पर्यंत ४७ हजार १७६ शालाबाह्य मुले सापडली या दोघांची बेरीज केली तर ही संख्या १ लाख २२ हजार १४७ वर जाते. परंतु नुकतेच मान. शिक्षण सचिवांनी मान्य केल्यानुसार ही संख्या ४ लाखांपेक्षा अधिक असू शकते हे मान्य केले. यावरून आपल्याला या प्रश्नाची दाहकता समजू शकते.

- मागील ५ वर्षांमध्ये विकास खर्च १३.३ टक्के चक्रवाढ वार्षिक वृद्धीदराने वाढत आहे. याबद्दल शासनाचे अभिनंदन मात्र सन २०१७-१८ मध्ये सामाजिक सेवा, सर्वसाधारण शिक्षण तसेच अनुसूचित जाती-जमाती व इतर मागास वर्ग व अल्पसंख्यांकांचे कल्याण यांच्या खर्चात मोठ्या प्रमाणावर घट झाल्याचे निदर्शनास आले आहे.

- सर्वसाधारण शिक्षणासाठी वर्ष २०१७-१८ मध्ये रु. ७१ हजार ३१३ कोटी ८३ लाख (३१.७) खर्च होणे अपेक्षित होते मात्र या वर्षात केवळ रु. ५३ हजार ५३८ कोटी २७ लाख खर्च झाले असून खर्चाचे हे प्रमाण २३.७९ टक्केच आहे. याचाच अर्थ यावर्षी रु. १७ हजार ७७५ कोटी ५६ लाख कमी खर्च झाले आहेत.

# शालेय शिक्षणाची ठळक वैशिष्ट्ये

## राज्याची शैक्षणिक स्थिती :

☞ राज्याची लोकसंख्या ११ कोटी २४ लाख असून त्यापैकी १ कोटी ६३ लाख व्यक्ती निरक्षर आहेत.

☞ राज्यात माध्यमिक शिक्षण पूर्ण केलेल्यांची संख्या केवळ ४ कोटी ४७ लाख (३९.८%) आहे. म्हणजेच ६ कोटी ७७ लाख (६०.२%) व्यक्तीचे माध्यमिक शिक्षणही झालेले नाही.

☞ वर्ष २०१७-१८ मध्ये प्राथमिक शाळांची संख्या मागील वर्षाच्या तुलनेत १ हजार ५५७ ने वाढून १ लाख ६ हजार ५२७ झाली.

☞ वर्ष २०१७-१८ मध्ये ४८ हजार ३७९ शाळाबाह्य मुले आढळून आलीत त्यापैकी ३२ हजार ८५० मुले आजही शाळाबाह्यच आहेत. म्हणजेच शासन सर्वच शाळाबाह्य मुलांना शाळेत आणू शकलेली नाहीत.

☞ मुलींच्या शिक्षणासाठी हे शासन किती संवेदनशील आहे हे वेळोवेळी सांगत असते. मात्र मुलींना मिळणारा उपस्थिती भत्ता, अहिल्याबाई होळकर योजना, कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय योजना तसेच ११वी व १२वीत शिकणाऱ्या विद्यार्थिनींना मोफत शिक्षण या योजनेसाठी २०१६-१७ मध्ये रु. ९३ कोटी ४७ लाख रुपये खर्च झाला होता तर २६ लाख विद्यार्थिनींनी या योजनेचा लाभ घेतला होता. त्यात २०१७-१८ मध्ये केवळ डिसेंबर पर्यंत १९ लाख ७८ हजार विद्यार्थिनींना लाभ मिळाला व खर्च रु. ७६ कोटी ४२ लाख इतका झाला म्हणजेच ६ लाख २२ हजार लाभार्थी विद्यार्थिनींची घट झाली तर खर्चही रु.१७ कोटी ५ लाखांनी घटला.

☞ राज्याने प्राथमिक शिक्षणास महत्त्व दिल्यामुळे साक्षरता दरात सातत्याने सुधारणा होत आहे. जनगणना २०११ नुसार अखिल भारतीय स्तरावरील ७३% साक्षरता दराच्या तुलनेत राज्याचा साक्षरता दर ८२.३% आहे.

☞ राज्यातील साक्षरतेचे प्रमाण ८२.३% आहे. मात्र त्याचवेळी अनुसूचित जातीमध्ये साक्षरतेचे प्रमाण ७९.७% व अनुसूचित जमातीमध्ये साक्षरतेचे प्रमाण त्याही पेक्षा कमी ६५.७% आहे.

*स्त्रोत: महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१७-१८*

## प्राथमिक उच्च प्राथमिक शाळा, शिक्षक आणि विद्यार्थी :

☞ वर्ष २०१७-१८ मध्ये प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांची (इयत्ता १ली ते ८वी) संख्या १ लाख ६ हजार ५२७ इतकी होती. त्यामध्ये ३६ जिल्ह्यांचा समावेश असून ४३ हजार ६६१ गावांचा समावेश आहे.

☞ राज्याचे एकूण साक्षरता प्रमाण ८२.९ % असून पुरुष साक्षरता प्रमाण ८९.८% तर स्त्री साक्षरता प्रमाण ७५.५ % आहे.

☞ ७७ हजार ९७१ शाळा या ग्रामीण भागात असून त्यापैकी १६ हजार २०२ शाळा या खाजगी स्वरुपाच्या आहेत.

☞ १ लाख ६ हजार ५२६ शाळांमधून १ कोटी ५९ लाख १ हजार विद्यार्थी शिक्षण येत आहेत. मागील वर्षाच्या तुलनेत या वर्षी ७७ हजार विद्यार्थ्यांची गळती झाली आहे.

☞ ७५ हजार ५१३ विद्यार्थी हे मदरसा व अमान्यताप्राप्त शाळांमधून शिक्षण घेत आहेत.

☞ ९८ हजार २१३ शाळांमधून १ कोटी ६० लाख ४३ हजार ७७५ विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी असणाऱ्या शिक्षकांची संख्या ६ लाख ६६ हजार ६२५ इतकी आहे. त्यापैकी ३९ हजार ३८९ (५.९०%) शिक्षक हे कंत्राटी तत्त्वावर शिकवत आहेत.

## राज्यातील प्राथमिक शिक्षणाचे वास्तव:

☞ सर्वांना शिक्षण हक्क कायदा, २००९ मध्ये आल्यानंतर महाराष्ट्रात २०११ मध्ये त्याची अंमलबजावणी सुरु झाली त्याला ७ वर्षे उलटून गेली तरी राज्यात सुरू असलेल्या ९८ हजार २१३ प्राथमिक शाळांपैकी ३ हजार ७९६ शाळा या एक शिक्षकी आहेत.

☞ राज्यातील ३ हजार १४२ शाळा या प्रत्येकी एक वर्ग खोलीत भरतात.

☞ राज्यातील १ हजार ५२८ शाळांमध्ये विद्यार्थ्यांना पिण्याचे पाणी उपलब्ध नाही.

☞ राज्यातील १५ हजार १२६ शाळा रस्त्यांनी जोडल्या गेलेल्या नाहीत.

☞ आंतरराष्ट्रीय स्तरावर पुरस्काराची अपेक्षा शासन करते मात्र आजही १४ हजार ५९४ शाळांमध्ये मुलांना खेळण्यासाठी खेळाचे मैदान उपलब्ध नाही.

☞ १८ हजार ४२९ शाळांना कुंपण भिंत बांधलेली नाही.

☞ महिला सबलीकरण, महिला सुरक्षिततेची भाषणे करणाऱ्या शासनाच्या राज्यात ३ हजार ४०८ शाळांमध्ये मुलींना स्वच्छतागृहाची सुविधा उपलब्ध नाही.

☞ ५ हजार ४३२ शाळांमध्ये मुलांना ग्रंथालय उपलब्ध नाही.

☞ २ हजार ७४९ शाळांमध्ये आजही मध्यान्ह भोजन दिले जात नाही.

☞ ११ हजार ५८९ शाळांमध्ये स्वयंपाक करण्यासाठी (**Kitchen shed**) वेगळी खोली बांधलेली नाही.

☞ मेक इन महाराष्ट्राची प्रचार आणि प्रसार करणाऱ्या राज्यात आजही ६ हजार १७८ शाळांमध्ये वीज जोडणी झालेली नाही. या शाळा पूर्णपणे अंधारात आहेत.

☞ इ-गव्हर्नन्स, डिजिटल महाराष्ट्राचा उद्घोष करणाऱ्या शासनाच्या राज्यात ३३ हजार २३६ शाळांमधून आजही संगणक उपलब्ध नाहीत.

☞ दुर्बल अपंग यांचे पालकत्त्व संविधानाने शासनाकडे दिलेले आहे, मात्र आजही ६ हजार ८७४ शाळांमध्ये अपंग विद्यार्थ्यांसाठी उतरंड बांधलेली नाही.

☞ २ हजार ६५१ शाळांमध्ये शिक्षण हक्क कायदा, २००९ नुसार शाळा व्यवस्थापन समिती स्थापन झालेली नाही.

☞ राज्यातील विविध शाळांमध्ये ५ लाख १६ हजार २१३ वर्गखोल्या आहेत, त्यापैकी २९ हजार ३०१ वर्गखोल्या धोकादायक स्थितीत आहेत.

☞ ६ लाख ६६ हजार ३३८ शिक्षकांपैकी १ हजार ८६८ शिक्षकांचे शिक्षण इयत्ता १०वी पर्यंतही झालेले नाही. ८२ हजार ४२७ शिक्षकांचे शिक्षण हे इयत्ता १०वी पर्यंत झाले आहे. १ लाख ५६ हजार ३४६ शिक्षक हे उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेले होते. ३ लाख ३ हजार ६५५ शिक्षक हे पदवीधर होते.. तर १ लाख १९ हजार ८९७ शिक्षक पदव्युत्तर होते. तर १ हजार ९७१ शिक्षक हे एम. फिल./ पी. एच. डी. झालेले १७० शिक्षक हे पोस्ट डॉक्टरेट केलेले होते.

☞ पोस्ट डॉक्टरेट झालेले १४ शिक्षक तर एम. फिल / पी. एच. डी. झालेले १३५ शिक्षक इयत्ता १ ली ते ५ वीच्या वर्गात शिकवत होते.

-स्रोत: *www.udise.in* (2015-16)

## शाळाबाह्य मुले

''शिक्षण हक्क '' कायद्यानुसार एकही मूल शाळाबाह्य किंवा शिक्षणापासून वंचित राहणार नाही ही शासनाची जबाबदारी आहे. मागील वर्षी सामाजिक संस्थेच्या सर्वेक्षणात ४ लाखांहून अधिक मुले शाळाबाह्य असल्याचे दिसून आले होते. तर शासनाच्या सर्वेक्षणात कधी ७४ हजार तर कधी ५५ हजार तर कधी १० हजार असे विविध आकडे पुढे आले. शासन एकंदरित प्राथमिक शिक्षणाच्या व शाळाबाह्य मुलांच्या शिक्षणाप्रति किती संवेदनशील आहे याची कल्पना येते. यावर्षीच्या आर्थिक पाहणीनुसार डिसेंबर २०१७ पर्यंत ४८ हजार ३७९ मुले शाळाबाह्य होती. यापैकी १५ हजार ५२९ मुलांची नोंदणी शाळेत करण्यात आली आहे. तर उर्वरित ३२ हजार ८५० मुलांना शासनाने वाऱ्यांवर सोडले आहे.

*स्रोत: महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१७-१८*


# शालेय शिक्षण विभाग

सामाजिक आणि आर्थिक विकासाची प्रगती सुकर करण्यासाठी शिक्षणाचे महत्त्व सर्वमान्य आहे. शिक्षणामुळे वैयक्तिक आणि सामूहिक नावलौकिक मिळविण्याच्या संधी उपलब्ध होतात. लोकांना कौशल्य व ज्ञान मिळवून देऊन त्यांना उत्पादक रोजगारीची संधी मिळवून देणे आणि पर्यायाने राज्याच्या आर्थिक विकासाला गतिमान करण्यासाठी तसेच युवकांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी शिक्षण हे एक अत्यंत निर्णायक साधन आहे. शिक्षणाद्वारे व्यक्तीचे केवळ लेखन व वाचन संस्था विकसित करणे एवढेच अपेक्षित नसून व्यक्तीमधील सुप्त गुणांचा शोध घेऊन त्यांचा विकास करून, परिपूर्ण व्यक्तिमत्त्व घडविणे हे शिक्षणाचे अंतिम ध्येय आहे. त्यासाठी महाराष्ट्र राज्याला यापुढे भौतिक पायाभूत सुविधांसोबत (Physical Infrastructure) सामाजिक पायाभूत सुविधा (Social Infrastructure) निर्माण करण्यावर भर द्यावा लागणार आहे. महाराष्ट्रात भौतिक पायाभूत सुविधांसाठी ज्या गतीने निधी उपलब्ध होतो. तशीच गती शिक्षणाचा समावेश असणाऱ्या सामाजिक पायाभूत सुविधांवर करणे क्रमपात्र ठरते.

## मागील ६ वर्षांत शालेय शिक्षण विभागाच्या एकूण अर्थसंकल्पात सरासरी खर्च

## केवळ ३३ हजार १६८ कोटी रुपये

*आलेख क्र. १.* *(रु. कोटीत)*




| | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अर्थसंकल्पीय अंदाज | २७७८८ | २९६३६ | ३३९५३ | ३५४६२ | ४०१४६ | ४२६२१ | ४८८४४ | ५१५६५ |
| सुधारित अंदाज | २६७२८ | ३०४५३ | ३३०९६ | ३६४२९ | ४००६२ | ४१५६४ | ४६१८२ | |
| प्रत्यक्ष खर्च | २६०७२ | २९०९२ | ३२५९३ | ३४७७५ | ३७४५६ | ३९०२३ | | |

*(स्त्रोत :वित्तविषयक विवरणपत्र व अर्थसंकल्पीय अंदाजपुस्तिका, निव्वळ रकमा)*
*टीप: वर्ष २०१७-१८चे सुधारित अंदाज व वर्ष २०१८-१९ चे अर्थसंकल्पीय अंदाज)*


- **वर्ष २०१०-११ ते वर्ष २०१६-१७ या मागील ६ वर्षांत शालेय शिक्षण विभागाचा सरासरी खर्च हा रु.३३ हजार १६८ कोटी इतका झाला.**
- **मागील ६ वर्षांत सुधारित अंदाज हे मोठ्या स्वरूपात मांडले गेले मात्र विभागाला त्याप्रमाणात निधी उपलब्ध झाल्याचे दिसून येत नाही.**
- **त्यामुळे वर्ष २०१८-१९ चे अर्थसंकल्पीय अंदाज व वर्ष २०१७-१८ मधील सुधारित अंदाज हे मोठ्या स्वरूपात मांडले जाऊनही विभागाला मात्र त्यामानाने कमीच निधीची उपलब्धता होईल.**

# गेल्या ६ वर्षात प्राथमिक शिक्षणावर झालेला खर्च ५२ टक्के

## शासनाचे आश्वासन मात्र ७५ टक्क्यांचे

लोकशाही आघाडी शासनाने सन २००० मध्ये जाहीर केलेल्या किमान समान कार्यक्रमात राज्य स्थूल उत्पन्नाच्या किमान ७ % रक्कम शिक्षणासाठी राखून ठेवण्यात येईल व त्यापैकी ७५% रक्कम प्राथमिक शिक्षणासाठी प्राथम्याने राखून ठेवण्यात येईल असे म्हटले होते. मात्र आघाडी शासनाने आपली उक्ती सार्थ केली नाही त्यांच्या पायावर पाऊल ठेवीत २०१४ मध्ये आलेल्या युती शासनानेही प्राथमिक शिक्षणासाठी ७५% निधी उपलब्ध केलेला नाही.

*आलेख क्र. २*





*(स्रोत: खर्चाचा प्रधानशीर्ष नि विभागवार सारांश व लोकलेखा, अर्थसंकल्पीय अंदाजपुस्तिका, निव्वळ रकमा)*
*टीप: वर्ष २०१७-१८चे सुधारित अंदाज व वर्ष २०१८-१९ चे अर्थसंकल्पीय अंदाज)*

- वर्ष २०१७-१८मध्ये शिक्षणावरील एकूण खर्चापैकी सर्वाधिक ५५.८१% रक्कम प्राथमिक शिक्षणासाठी सुधारित अंदाज करण्यात आले आहेत. वर्ष २०१८-१९ मध्ये ५५.१०% निधी अंदाजित केला आहे. म्हणजे तो २०१७-१८ पेक्षा कमी आहे. मात्र जेव्हा वर्ष २०१७-१८मध्ये निधी प्राथमिक शिक्षणासाठी उपलब्ध केला जाईल तेव्हा त्यात घट झालेली असेल.
- वर्ष २०११-१२ ते वर्ष २०१६-१७ या ६ वर्षात शिक्षणावर होणाऱ्या एकूण खर्चात प्राथमिक शिक्षणावर होणारा सरासरी खर्च केवळ ५२.४६ % राहिला आहे.
- गेल्या ६ वर्षात प्राथमिक शिक्षणासाठी सर्वात जास्त निधी वर्ष २०११-१२ मध्ये ५३.१०% उपलब्ध झाला होता. तर २०१७-१८मध्ये ५५.८१% निधी सुधारित केला आहे.
- **वर्ष २०१५-१६ मध्ये नव्याने आलेल्या शासनानेही मागील ३ वर्षात प्राथमिक शिक्षणाप्रती आस्था दाखविलेली नाही. प्राथमिक शिक्षणासाठी ७५% निधी राखून ठेवणे अपेक्षित होते. मात्र प्राथमिक शिक्षणासाठीचा खर्च प्रत्यक्षात एकाही वर्षी ५५% च्या वर गेला नाही. त्यामुळे यापुढेही प्रत्यक्षात कमी निधी उपलब्ध होणार हे गृहित धरले पाहिजे.**

# राज्य अर्थसंकल्पापैकी सर्वसाधारण शिक्षणावर होणारा खर्च १७ टक्के

*आलेख क्र. ३*

**राज्य अर्थसंकल्पापैकी सर्वसाधारण शिक्षणावर होणाऱ्या खर्चाचे प्रमाण**




| | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| टक्केवारी | १८.९४ | १७.५० | १९.२१ | १७.२७ | १५.८३ | १६.४८ | १५.६५ | १५.२५ |

*(स्त्रोत : संक्षिप्त अर्थसंकल्प, व खर्चाचा प्रधान शीर्षवार नि विभागवार सारांश व लोकलेखा, निव्वळ रकमा)*
*टीप: वर्ष २०१७-१८चे सुधारित अंदाज व वर्ष २०१८-१९ चे अर्थसंकल्पीय अंदाज)*

- राज्य अर्थसंकल्पापैकी सर्वसाधारण शिक्षणावर मागील ६ वर्षांत सरासरी १५.५३ % निधी उपलब्ध.
- सर्वसाधारण शिक्षणावर होणाऱ्या खर्चाचा आलेख पाहता असे दिसते की, या शासनाचा वर्ष २०१५-१६ मध्ये ते सर्वात कमी १५.८३% इतके होते. तर वर्ष २०१३-१४मध्ये ते सर्वात जास्त १९.२१% इतके होते.
- वर्ष २०११-१२ ते २०१६-१७ या ६ वर्षांच्या कालावधीत या शासनाच्या काळात २०१५-१६ मध्ये सर्वसाधारण शिक्षणावर होणारा खर्च सर्वात कमी झाला असून तो १५.८३% आहे.
- **मागील ६ वर्षात सर्वसाधारण शिक्षणावर होणारा खर्च हा राज्य अर्थसंकल्पाशी तुलना करता कधीच २० टक्क्यांपेक्षा जास्त झालेला नाही.**


***अर्थसंकल्पात सांगितल्याप्रमाणे शालेय शिक्षणावर ३० हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्च करण्यात येत असला तरी गुणात्मक फरक दिसून येत नाही तसेच विभागाने सर्वसाधारण शिक्षणावर राज्याच्या एकूण महसुली खर्चाच्या १/६ निधी खर्च करणे गरजेचे आहे. मात्र शासनाने कधीच तेवढा निधी खर्च केलेला नाही.***

*-स्त्रोत: अर्थसंकल्प, २०१८-१९ आणि कार्यक्रम अंदाजपत्रक, २०१७-१८ शालेय शिक्षण (प्राथमिक शिक्षण)*

# सर्वसाधारण शिक्षण व तंत्रशिक्षणावरील खर्च

## राज्य स्थूल उत्पन्नाच्या केवळ २.३० टक्के

*आलेख क्र.४*




*(स्त्रोत : संक्षिप्त अर्थसंकल्प, व खर्चाचा प्रधान शीर्षवार नि विभागवार सारांश व लोकलेखा, निव्वळ रकमा)*

*(टीप: शिक्षणावरील एकूण खर्चात २२०२, सर्वसाधारण शिक्षण व २२०३, तंत्र शिक्षण यांचा समावेश आहे)*

*(टीप: वर्ष वर्ष २०१७-१८चे सुधारित अंदाज व वर्ष २०१८-१९चे अर्थसंकल्पीय अंदाज)*

- **शिक्षणावरील खर्च हा २२०२, सर्वसाधारण शिक्षण व २२०३, तंत्र शिक्षण या प्रधान शीर्षांच्या अंतर्गत होतो. या दोन्ही शीर्षांवर होणाऱ्या खर्चाचे राज्य स्थूल उत्पन्नाशी असलेले प्रमाण वर्ष २०११-१२ ते २०१६-१७ पर्यंत सरासरी २.३०% इतके होते.**

- **वर्ष २०१७-१८ मध्ये सुधारित अर्थसंकल्प सर्वसाधारण शिक्षण व तंत्र शिक्षण यावरील खर्चाचे प्रमाण केवळ १.९८ टक्के इतकेच अर्थसंकल्पीत करण्यात आले आहे. म्हणजे सर्वसाधारण शिक्षण व तंत्र शिक्षणावर होणारा खर्च २०१४-१५ पेक्षाही कमी अर्थसंकल्पीत झाला आहे. आतापर्यंतचा हा सर्वात नीचांक असून त्यापेक्षाही कमी निधी उपलब्ध होईल.**

- **वर्ष २०१६-१७ मध्ये सर्वसाधारण शिक्षण व तंत्र शिक्षण यावर खर्चाचे प्रमाण १.९८% एवढे झाले आहे. वर्ष २०१३-१४ नंतर त्यात सातत्याने घट होत आहे.**

- **वर्ष २०१२-१३ मध्ये सर्वसाधारण शिक्षण व तंत्र शिक्षणावर राज्य स्थूल उत्पन्नाच्या तुलनेत २.५२% खर्च करण्यात आले होते. हे प्रमाण गेल्या ६ वर्षात सर्वात अधिक राहिले आहे. तर वर्ष २०१६-१७ मध्ये सर्वात कमी राहिले आहे.**

# खुद्द शालेय शिक्षण व क्रीडा विभागातील २०४ पैकी ५६ पदे रिक्त

तक्ता क्र. ४

| अक्र. | पद | मंजूर पदांची संख्या | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| | गट - अ | | | |
| १. | प्रधान सचिव | १ | १ | - |
| २. | सह सचिव | १ | २ (१उन्नत) | - |
| ३. | उपसचिव | ४ | ३ | - |
| ४. | सह सचिव (विधी) | १ | १ (उन्नत) | - |
| ५. | अवर सचिव | ११ | १० | - |
| ६. | उपसंचालक (सांख्यिकी) | १ | ० | १ |
| ७. | निवडश्रेणी लघुलेखक | १ | १ | १ |
| | | गट - ब | | |
| ८. | कक्ष अधिकारी | २१ | १८ | ३ |
| ९. | सहाय्यक कक्ष अधिकारी | ५५ | ४१ | १४ |
| १०. | संशोधन सहाय्यक | ३ | ३ | - |
| ११. | उच्च श्रेणी लघुलेखक | ७ | ६ | १ |
| १२. | निम्नश्रेणी लघुलेखक | ११ | ५ | ६ |
| | | गट -क | | |
| १३. | लघुटंकलेखक | १ | - | १ |
| १४. | लिपिक - टंकलेखक | ६१ | ३८ | २३ |
| १५. | वाहन चालक | १ | १ | - |
| | | गट - ड | | |
| १६. | शिपाई | २४(३ पदे निरसित) | १८ | ६ |
| | **एकूण** | **२०४** | **१४८** | **५६** |

*स्रोत: माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त माहिती (३१ डिसेंबक २०१७)*

- **शालेय शिक्षण व क्रीडा विभागात एकूण २०४ पदे मंजूर आहेत त्यापैकी ५६ पदे रिक्त असून १४८ पदे भरण्यात आली आहेत. मंजूर पदांपैकी रिक्त पदांचे प्रमाण २७.४५% आहे.**
- **उपसंचालक (सांख्यिकी) एक पद मंजूर असून एवढे महत्त्वाचे पदही रिक्त आहे. तसेच कक्ष अधिकाऱ्यांचे २१ मंजूर पदांपैकी ३ पदे रिक्त असून, सहाय्यक कक्ष अधिकाऱ्यांच्या ५५ मंजूर पदांपैकी १४ पदे रिक्त आहेत.**
- **लिपिक - टंकलेखकांच्या ६१ मंजूर पदांपैकी २३ (३८ %) पदे रिक्त आहेत.**

# शिक्षण संचालनालय पुणे-३९८ मंजूर पदांपैकी २०६ पदे रिक्त

## आयुक्त (शिक्षण) आस्थापनेवरील रिक्त पदे

तक्ता क्र. १

| अक्र. | पदनाम | मंजूर पदे | कार्यरत पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| | **गट - ब** | | | |
| १ | अधिक्षक म. शिक्षण सेवक | ३ | २ | १ |
| | **एकूण** | **३** | **२** | **१** |
| | **गट -क** | | | |
| १. | सहाय्यक अधिक्षक | १६ | ८ | ८ |
| २. | मुख्य लिपिक | ३३ | १८ | १५ |
| ३. | वरिष्ठ लिपिक | ७८ | ४८ | ३० |
| ४. | कनिष्ठ लिपिक | १०७ | ३४ | ७३ |
| ५. | वाहन चालक | १८ | ९ | ९ |
| ६. | उच्च श्रेणी लघुलेखक | ४ | १ | ३ |
| ७. | निम्न श्रेणी लघुलेखक | १५ | ९ | ६ |
| ८. | लघुटंकलेखक | ४ | १ | ३ |
| | **एकूण** | **२७५** | **१२८** | **१४७** |
| | **गट -ड** | | | |
| १. | नाईक | १० | २ | ८ |
| २. | शिपाई | १५ | ५३ | ४२ |
| ३. | सफाई कामगार | ५ | ४ | १ |
| ४. | माळी | ३ | २ | १ |
| ५. | दप्तरी | १ | ० | १ |
| ६. | पहारेकरी/चौकीदार | ४ | १ | ३ |
| ७. | पाणीवाला | १ | ० | १ |
| ८. | रखवालदार | १ | ० | १ |
| | **एकूण** | **१२०** | **६२** | **५८** |
| | **एकूण रिक्त पदे** | **३९८** | **१९२** | **२०६** |

*स्रोत: माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त माहिती दि. २मार्च, २०१८*

- **आयुक्त (शिक्षण) कार्यालयाच्या आस्थापनेवर माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय प्राथमिक, शिक्षण संचालनालय प्रौढ शिक्षण व दृकश्रवण शिक्षण संस्था यांचा समावेश होतो. सदर आस्थापनेवर गट क व ड ची १२० पदे मंजूर असून त्यापैकी ६२ पदे भरली गेली असून ५८(४८%) पदे रिक्त आहेत.**
- **या पदांमध्ये सहाय्यक अधिक्षकांची ८ पदे रिक्त असून वरिष्ठ लिपिक ३०, कनिष्ठ लिपिक ७३ तर शिपाई ४२ ही पदे रिक्त आहेत.**
- **आयुक्त शिक्षण कार्यालयात अधिक्षक शिक्षण सेवक वर्ग ब मध्ये ३ पदे मंजूर असून त्यापैकी २ पदे भरली गेली आहेत. तर १ पद रिक्त आहे.**

# केंद्र शासनाच्या माहितीप्रमाणे राज्यात शिक्षकांची ३२ हजार ९४४ पदे रिक्त

## वर्ष २०१५-१६

तक्ता क्र.२

| शाळा | मंजूर | | | भरलेली | | | रिक्त | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | राज्य | स.शि.अ. | एकूण | राज्य | स.शि.अ. | एकूण | राज्य | स.शि.अ. | एकूण |
| **प्राथमिक** | २०१२५३ | २७५७० | २२८८२३ | २०१२५३ | १४९४० | २१६१९३ | ० | १२६३० | १२६३० |
| **मुख्याध्यापक** | ७९५२ | ११८७८ | १९८३० | ७९५२ | ० | ७९५२ | ० | ११८७८ | ११८७८ |
| **उच्च प्राथमिक** | ७४२०४ | १३०९ | ७५५१३ | ६७९६४ | ४४७ | ६३४११ | ६२४० | ८६२ | ७१०२ |
| **मुख्याध्यापक** | ३२८७ | १३३४ | ४६२१ | ३२८७ | ० | ३२८७ | ० | १३३४ | १३३४ |
| **एकूण** | **२८६६९६** | **४२०९१** | **३२८७८७** | **२८०४५६** | **१५३८७** | **२९०८४३** | **६२४०** | **२६७०४** | **३२९४४** |

*स्त्रोत: मनुष्यबळ विकास मंत्रालय, भारत सरकार*

- **वर्ष २०१५-१६ पर्यंत राज्यातील प्राथमिक व उच्च प्राथमिक मंजूर शिक्षक व मुख्याध्यापकांची संख्या ३ लाख २८ हजार ७८६ होती. त्यापैकी २ लाख ९० हजार ८४३ पदे भरण्यात आली व ३२ हजार ९४६ शिक्षक व मुख्याध्यापकांची पदे रिक्त आहेत.**
- **प्राथमिक व उच्च प्राथमिक शिक्षक व मुख्याध्यापकांची पदे पाहिली तर आजही अनुक्रमे १९ हजार ७३२ शिक्षक व १३ हजार २१२ मुख्याध्यापकांची पदे रिक्त आहेत.**
- **प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांतील शिक्षकांच्या पदे पाहिली तर असे लक्षात येते की, एकूण रिक्त पदांपैकी २४ हजार ५०८ पदे ही प्राथमिक शाळेतील आहेत एकूण रिक्त पदांमध्ये हे प्रमाण ७४.३९% आहे.**
- **मुख्याध्यापकांची एकूण १३ हजार ३१२ पदे रिक्त असून त्यापैकी प्राथमिक शाळांमधील ११ हजार ८७८ (८९.२२%) पदे रिक्त आहेत.**

## एक शिक्षकी शाळांचे ग्रहण सुटेना!

शिक्षण हक्क कायद्यानुसार एक शिक्षकी शाळा कालबाह्य ठरविल्या आहेत. ६० विद्यार्थ्यांपर्यंत २ शिक्षक असणे अनिवार्य केले आहे. १ एप्रिल २०१३ पासून या कायद्याची अंमलबजावणी सुरू झाली. परंतु राज्यात आजही ३ हजार ७९६ शाळा एक शिक्षकी असताना याचे समर्थन शिक्षण मंत्री कसे करणार ? त्यामुळे एका शिक्षकाला किमान ४ किंवा त्यापेक्षा अधिक वर्ग सांभाळावे लागतात. शैक्षणिक वातावरणाअभावी शैक्षणिक असमतोल, विद्यार्थी गळती. अध्ययन अध्यापन प्रक्रियेला खीळ बसत आहे. आज संपूर्ण महाराष्ट्रात ९८ हजार २१३ प्राथमिक शाळांपैकी, ३ हजार ७९६ शाळा या एक शिक्षकी आहेत. असे 'डायस' चा २०१५-१६ चा अहवाल सांगतो. संयुक्त राष्ट्र संघाच्या जाहीरनाम्यानुसार बालकांच्या दहा हक्कांपैकी सातवा हक्क शिक्षणाचा आहे. भारतीय संविधानाने कलम २१ (क) प्रमाणे सहा ते १४ वर्षांच्या बालकांना मोफत तसेच सक्तीच्या शिक्षणाचा हक्क बहाल केला आहे. मात्र वरील स्थिती पाहता शिक्षणाचा दर्जा सुधारत असल्याचा राज्य शासनाचा दावा फोल ठरला आहे. याबाबत हे शासन कोणती उपाययोजना करणार आहे.

# राज्यात ३ हजार ७९६ शाळा एक शिक्षकी

तक्ता क्र. ३

| अक्र. | जिल्हा | शाळांची संख्या | अक्र. | जिल्हा | शाळांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १. | अहमदनगर | १०२ | १९. | नागपूर | ६३ |
| २. | अकोला | ३८ | २०. | नांदेड | ६७ |
| ३. | अमरावती | २८ | २१. | नंदुरबार | १४९ |
| ४. | औरंगाबाद | १३० | २२. | नाशिक | १५० |
| ५. | भंडारा | २० | २३. | उस्मानाबाद | ४६ |
| ६. | बीड | ४७ | २४. | परभणी | १४६ |
| ७. | बुलडाणा | ८७ | २५. | पालघर | २३ |
| ८. | चंद्रपूर | ४१ | २६. | पुणे | २६५ |
| ९. | धुळे | १२ | २७. | रायगड | ३७२ |
| १०. | गडचिरोली | १५७ | २८. | रत्नागिरी | २५७ |
| ११. | गोंदिया | २९ | २९. | सांगली | २११ |
| १२. | हिंगोली | २४ | ३०. | सातारा | १६० |
| १३. | जळगांव | ८४ | ३१. | सिंधुदुर्ग | १४२ |
| १४. | जालना | ९१ | ३२. | सोलापूर | १६२ |
| १५. | कोल्हापूर | १७१ | ३३. | ठाणे | २३७ |
| १६. | लातूर | ५७ | ३४. | वर्धा | २५ |
| १७. | मुंबई | ३० | ३५. | वाशिम | २६ |
| १८. | मुंबई उपनगर | ४२ | ३६. | यवतमाळ | १०५ |
| | | | | **एकूण** | **३,७९६** |

*स्त्रोत: महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई माहितीच्या अधिकाराखाली दि. २ फेब्रुवारी, २०१८ रोजी प्राप्त माहिती*

- **राज्यभरात ३ हजार ७९६ या एकशिक्षकी शाळा असून सर्वात जास्त एकशिक्षकी शाळा ३७२ (९.७९%) रायगडमध्ये आहेत. त्या खालोखाल शिक्षणाच्या पंढरीत २६५ (६.९८%) शाळा या एकशिक्षकी आहेत. तर तिसरा क्रमांक रत्नागिरी जिल्ह्याचा लागला असून २५७ (६.७७%) शाळा एकशिक्षकी आहेत.**

- **ठाणे जिल्ह्यात २३७ ( ६.२४%) व पालघर जिल्हा १४६ (३.८४%) शाळा या एकशिक्षकी आहेत.**

# सर्व शिक्षा अभियानाचे ३ हजार ६३४ कोटी अखर्चित

## "शिक्षण हक्क" कायद्याच्या अंमलबजावणीलाच शासनाने फासली हरताळ

तक्ता क्र. ५

| अक्र. | वर्ष | अनुदान वितरण | | जमा रकमेसह मंजूर वार्षिक अंदाजपत्रक | खर्च | घट | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | केंद्र शासन | राज्य शासन | | | | |
| १. | २०११-१२ | १,१७९ | ६३५ | २,९३४ | १,७३१ | १,२०३ | ५८ |
| २. | २०१२-१३ | १,०६८ | ५३५ | २,६१४ | १,४८८ | १,१२६ | ५७ |
| ३. | २०१३-१४ | ६५६ | २५३ | १,२९९ | ९१४ | ३८५ | ७० |
| ४. | २०१४-१५ | ५६९ | ३२० | १,४१८ | १,०८६ | ३३२ | ७७ |
| ५. | २०१५-१६ | ४२० | ८५६ | १,५७४ | १,३०१ | २७३ | ८३ |
| ६. | २०१६-१७ | ६०८ | १,३२८ | २,२९६ | १,९८१ | ३१५ | ८६ |
| | **एकूण** | **४,५००** | **३,९२७** | **१२,१३५** | **८,५०१** | **३,६३४** | **७०** |

*स्रोत : कार्यक्रम अंदाजपत्रक - शालेय शिक्षण विभाग, प्राथमिक शिक्षण*

- ☞ **वर्ष २०११-१२ पासून २०१६-१७ पर्यंत रु. १२ हजार १३५ कोटी अर्थसंकल्पीत करण्यात आले होते. त्यापैकी रु. ८ हजार ५०१ कोटी खर्च झाले असून रु. ३ हजार ६३४ कोटींचा निधी कमी खर्च झाला आहे. याचा प्रतिकूल परिणाम शालेय भौतिक सुविधा निवासी वसतिगृह, शिक्षक प्रशिक्षण, शिक्षक अनुदान, विद्यार्थी गणवेश, बांधकाम तसेच संशोधन व मूल्यमापन याबाबींवर झाला त्यामुळे राज्यातील शिक्षणाची दर्जा वाढ करण्यात शासनाला अपयश आल्याचे निदर्शनास येते.**
- ☞ **६ ते १४ वर्ष वयोगटातील सर्व बालकांची नियमित शाळेत पटनोंदणी करणे, ती उपस्थित राहतील असे पाहणे, त्यांना शाळेत टिकवून धरणे आणि त्यांना गुणवत्ता व दर्जेदार शिक्षण देणे या सर्व गोष्टी अगत्याच्या आहेत. प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सर्व शिक्षा अभियान कार्यक्रम कार्यान्वित करण्यात आला होता. हा कार्यक्रम जर प्राधान्याने राबविला गेला तर संविधानाने कलम २१ (अ) नुसार बालकांना प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्यात आले होते ते उद्दिष्ट सफल झाले असते.**

# केळकर समितीने अभ्यासलेली राज्यातील शिक्षणाची स्थिती व सुचविलेल्या शिफारशी

☞ **शिक्षणाच्या हक्कामध्ये व राज्य सरकारच्या भौतिक पायाभूत सोयी सुविधांसाठी विहित केलेली मानके व प्रमाणके साध्य केली पाहिजेत, टिकवून ठेवली पाहिजेत आणि या संदर्भात काहीही खपवून घेता कामा नये.**

☞ **तसेच यासाठी पुरेशी वित्तीय तरतूद केली पाहिजे शिक्षणासाठी रक्कम कमी पडू देता कामा नये.**

☞ शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी अध्यापनशास्त्रात शिक्षकांचे पुनर्प्रशिक्षण करण्याची गरज आहे.

☞ **राज्यात विविध भागांतील लौकिक असलेल्या संस्थांना, मागासलेल्या क्षेत्रांमध्ये व अधिक विशेष म्हणजे आदिवासी क्षेत्रामध्ये त्यांची शैक्षणिक प्रांगणे (कॅंपस) उभारण्यासाठी प्रोत्साहित केले पाहिजे.**

☞ **शिक्षणामध्ये माध्यमस्तर व तांत्रिक स्तरावरील शिक्षणाचा समावेश केला गेला पाहिजे.**

☞ प्राथमिक शिक्षणाच्या इयत्ता ४थी नंतरच्या व इयत्ता ५वी नंतरच्या स्तरांवर सरकारी परीक्षा सुरू करण्यात याव्यात. ही परीक्षा गंभीरपणे घेण्यात यावी आणि प्राथमिक स्तरावर देण्यात येत असलेल्या शिक्षणाच्या दर्जाचे मोजमाप म्हणून या परीक्षांच्या निकालांचा वापर करण्यात यावा.

☞ मराठवाड्यामध्ये मुलींच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे  आणि म्हणून महिलांसाठी वसतिगृहे व अन्य पायाभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अतिरिक्त वित्तीय तरतूद  करण्यात यावी.

☞ **राज्याच्या काही भागात असलेला निरक्षरतेचा उच्च स्तर, हा अजूनही ''शाळाबाह्य'' मुलांना परिणामकारकपणे शिक्षणव्यवस्थेत सामावून घेण्यात न आल्यामुळे आहे त्यात सुधारणा करण्याबाबत शासनाने अधिक लक्ष देणे गरजेचे आहे.**

☞ **जरी साक्षरता दर ८२ टक्के असला तरी निरक्षरांची एकूण संख्या देखील खूपच जास्त आहे. महाराष्ट्रासारख्या राज्यात हे अपेक्षित नाही. साधन संपत्तीचा सुयोग्य वापर आणि विद्यमान धोरणांची परिणामकारक अंमलबजावणी या माध्यमातून ही परिस्थिती सुधारण्याची आवश्यकता आहे.**

☞ महिलांमधील निरक्षरता ही अधिक असून, त्यावर लक्ष केंद्रीत करण्याची आणि खास करून नंदूरबारसारख्या भागामध्ये कडक मोहीम राबवून याकडे गंभीरपणे लक्ष देण्याची गरज आहे.

☞ २०११ च्या जनगणनेत प्रत्येक जिल्ह्याच्या तालुक्यांमधील साक्षरता दराची माहिती दिली आहे. यावरून लक्षात येणारी बाब म्हणजे साक्षरता दर निर्देशांकानुसार जिल्हा जरी प्रगत असला तरी त्यात अनेक तालुके अप्रगत दिसून येतात. **उदा. ठाणे जिल्ह्याचा साक्षरता दर २०११ च्या जनगणनेनुसार ८६.२% आहे. तर तलासरी तालुक्यात ५८.९%, विक्रमगड ५७.८%, जव्हार ५८.६%, आणि मोखाडा तालुक्यात ५८.४% इतका साक्षरता दर नोंदविण्यात आला आहे. या जिल्ह्यांमधील महिला साक्षरता दर त्याहीपेक्षा कमी म्हणजे ४६ ते ५१% इतका आहे. हे मुख्य आदिवासी जिल्हे आहेत. आणि या जिल्ह्यांकरिता विशेष उपायोजना करणे आवश्यक आहे.**

☞ **ठाणे जिल्ह्यात रोजगारासाठी स्थलांतर करणाऱ्यांचे प्रमाण सर्वात जास्त असल्याने स्थलांतरित मुलांचे प्रमाणही या जिल्ह्यात सर्वात अधिक आहे.**

# राज्यातील शाळा व विद्यार्थ्यांचे आजचे वास्तव

- ☞ राज्यात एकूण १ लाख ११ हजार सरकारी शाळा आहेत त्यापैकी ८० हजार शाळा टप्प्या-टप्प्याने बंद करण्याचे संकेत शिक्षण विभागाचे प्रधान सचिव नंदकुमार यांनी दिले होते. याबाबत समाजमाध्यमातून प्रतिक्रिया आल्या नंतर, शाळा बंद होणार नाहीत असा खुलासा  करण्याची वेळ शिक्षणमंत्र्यांवर आली होती.
- ☞ देशातील २५% विद्यार्थ्यांना वाचताच येत नाही. “असर” **Annual Status Of Education Report** (भारतीय शिक्षणाचा वार्षिक दर्जा) यंदाही प्रसिद्ध करण्यात आला, त्या अहवालानुसार १४ ते १८ वयोगटातील  २८ हजार ३२३ विद्यार्थ्यांचे मूल्यमापन केले असता मुलांना आपल्या मातृभाषेची प्राथमिक ओळखही नसल्याचे स्पष्ट झाले. तसेच  त्यातील अनेक मुलांना तास, मिनिटे आणि सेकंदातील वेळ ही नीट सांगता आली नाही. ७६% मुलांना पैसे नीट मोजता आले नाहीत तर ९०% मुलांना साध्या गणिताची उत्तरेही देता आली नाहीत.
- ☞ वर्ष  २०१७ च्या पावसाळी अधिवेशनामध्ये विरोधी पक्षनेते विधान सभा यांनी विचारलेल्या शाळा बंदच्या प्रश्नाला उत्तर देताना शिक्षणमंत्र्यांनी अशी ग्वाही दिली की,आदिवासी व दुर्गम भागातील, डोंगराळ भागातील एकही शाळा बंद होणार नाही मात्र त्यानंतरही शाळा बंद करण्याचे निर्णय घेतले गेले आहेत.
- ☞ युडायस २०१६ नुसार राज्यात आजही ४ लाख २० हजार मुले शाळाबाह्य असल्याचे स्वत: शिक्षणमंत्र्यानी स्पष्ट केले आहे. तर अनेक सामाउजिक संस्थांच्या मते शाळाबाह्य मुलांची संख्या ७ लाखांपेक्षा अधिक आहे.
- ☞ पालघर सारख्या आदिवासी जिल्ह्यातील  जव्हार तालुक्यात २५० जिल्हा परिषद शाळा आहेत, त्यापैकी अनेक शाळांत विद्यार्थी संख्या समाधानकारक असूनही, शिक्षक नसल्याकारणाने अनेक शाळा बंद केल्या जात आहेत.